महाराष्ट्र शासन

क्र: अविवि २०२०/प्र.क्र.१३/का.३
अल्पसंख्याक विकास विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च, २०२०

प्रति,

संचालक ( माहिती तंत्रज्ञान )
सामान्य प्रशासन विभाग,
७ वा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय :-** शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (अँम्बँसेडर कार), या वाहनाच्या विक्रीची जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, या विभागातील शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (अँम्बँसेडर कार), या शासकीय वाहनाच्या विक्रीची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर निविदा जाहिरात **दिनांक ५ मार्च, २०२० रोजी प्रकाशीत करावी**, ही विनंती. सोबत निविदा जाहिरातीचा मजकूर जोडलेला आहे.

( ग.पि.मगदूम )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

क्र.अविवि २०२०/प्र.क्र.१३/का.३
अल्पसंख्याक विकास विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च, २०२०

## निविदा सूचना

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सन २०१० मध्ये खरेदी करण्यात आलेल्या त्यांच्या कार्यालयातील वाहन क्र. एमएच-०१-एएन ०७८६ ( अँम्बँसेडर ), या वाहनाच्या विक्रीकरीता मोहोरबंद निविदा मागविण्याची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या याच संकेतस्थळावर दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. डिएफपी १०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम, दि.२२.६.२०१६ मधील परि.३ मधील तरतूदींच्या अधीन राहून सदर निविदा सूचनेस याअन्वये खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर निविदा गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२० ते गुरूवार, दि. १२ मार्च, २०२० या कालावधीत कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ६.१५ या वेळेमध्ये पोहोचतील अशा पद्धतीने मोहोरबंद पाकीटातून पाठवाव्यात. विहित वेळेमध्ये प्राप्त होणाऱ्या निविदा दि. १३ मार्च, २०२० रोजी दुपारी ३.०० वाजता सहसचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचे समक्ष त्यांचे दालनात उघडण्यात येतील. या निविदांबरोबरच यापूर्वी याच वाहनाबाबत दि. २७ जानेवारी रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या दोन निविदा वाहन विक्रीच्या वेळी ग्राह्य धरण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाकारास व त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीस, तसेच याच वाहनासंदर्भात यापूर्वी निविदा सादर केलेल्या निविदाकरास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे, टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी.न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवलेले आहेत.

४. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार मा.अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

(ग.पि.मगदूम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**कक्ष अधिकारी**
अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

महाराष्ट्र शासन

क्र-अविवि २०२०/प्र.क्र.२०/का.३
अल्पसंख्याक विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च, २०२०

## निविदा संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १. | मोहोरबंद पाकीटात निविदा दिनांक ०५.०३.२०२० ते १२.०३.२०२० या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कक्ष अधिकारी(कार्यासन ३), दालन क्रमांक ७०१ (विस्तार), सातवा मजला, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर "क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (अँम्बॅसेडर कार), याच्या विक्रीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २. | "जसे आहे तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (अँम्बॅसेडर कार), हे वाहन तपासणीसाठी **विधानभवन परिसराच्या आवारात मुंबई येथे** उभे करण्यात आलेले आहे. सदर वाहन निविदा सादर करणाऱ्या इच्छुकाला या ठिकाणी पाहता येईल. |
| ३. | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक १२.०३.२०२० **रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत** या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. |
| ४. | इसाऱ्याची रक्कम रु.५००/-(अक्षरी रू. पाचशे फक्त ) अवर सचिव, रोखशाखा, अल्पसंख्याक विकास विभाग, दालन क्रमांक ७०१ (विस्तार), सातवा मजला, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे जमा करावी. |
| ५. | इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर रोखशाखा, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली पावती, निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ६. | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल. |
| ७. | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस त्यास मुकावे लागेल. |
| ८. | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| ९. | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १०. | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, overwriting,पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| ११. | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार मा.अपर मुख्य सचिव,अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना राहतील. |
| १२. | शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (अँम्बॅसेडर कार) या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| १३. | निविदाधारकाने स्वतःचे ओळखपत्र म्हणून आधार कार्ड ची झेराक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| १४. | प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो. |

( ग.पि.मगदूम )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**कक्ष अधिकारी**
अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रत,

कक्ष अधिकारी, (रोखशाखा) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्र. | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | निविदा सादर करावयाचा दिनांक | दिनांक १२.०३.२०२० रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत |
| ७ | निविदा उघडण्याची तारीख | दिनांक १३.०३.२०२० रोजी दुपारी ३.०० वा. |

प्रति,

कक्ष अधिकारी, (का.३)
अल्पसंख्याक विकास विभाग,
दालन क्रमांक ७०१ (विस्तार),सातवा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२

महोदय,

आपली निविदा सूचना क्र. अविवि २०२० /प्र.क्र.१३/का.३ च्या संदर्भात कक्ष अधिकारी(का.३), दालन क्रमांक ७०१ (विस्तार), सातवा मजला, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या आणि निविदा नमुन्यासोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार मी / आम्ही वाहन क्रमांक एमएच-०१-एएन ०७८६ (ॲम्बॅसेडर कार), हे रुपये --------------------/- (अक्षरी रुपये ------------------------------------ -------------- फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

मी / आम्ही निविदेबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

आपला विश्वासू,

(निविदाधारकाची सही)
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक

टिप :- कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.